पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** दिनांक १७/०६/२०२३

**“ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखा ”**

**“ स्वतःचे आर्थिक फायदयासाठी वेश्याव्यवसाय करवुन घेणा-यांवरती कारवाई करुन ०२ पिडीत महिलांची सुटका केली ”**

पिंपरी चिंचवड येथील स्पाचे नावाखाली काही दलाल स्वतःचे आर्थिक फायदयासाठी अवैध रित्या मुलींना स्पाचे नावाखाली जास्त पैशाचे अमिष दाखवून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडतात. अशी गोपनीय माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्राप्त झाली.

त्यानंतर अशा व्यक्तींची गोपनीय माहिती काढून, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखे कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक १५/०६/२०२३ रोजी रहाटणी परिसरातील APPLE SPA शॉप नं. ५०७, पाचवा मजला, रेनबो प्लाझा, शिवार चौक, रहाटणी, पुणे या ठिकाणी सापळा रचुन सदर ठिकाणी बनावट ग्राहकासह अचानकपणे छापा टाकुन, १) महिला आरोपी व २) रोहन विलास समुद्रे, वय ३४ वर्षे, रा. ४७३/२६६९ संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे यांच्या ताब्यातून दोन पिडीत मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन २ आरोपी विरुध्द वाकड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५७५/२०२३ अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास वाकड पोलीस स्टेशन करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो, मा. पोलीस सह आयुक्त, डॉ. संजय शिंदे सो, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी सो, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे मॅडम, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) सतीश माने सो यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षातील पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण, पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे, पोलीस अमंलदार, सुनिल शिरसाट, सुधा टोके, भगवंता मुठे, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, वैष्णवी गावडे, संगीता जाधव, रेश्मा झावरे, सोनाली माने यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड